# शिलानाथ जाधव,
**समंत्रक (लेखा व कोषागारे), महाराष्ट्र शासन, वित्त विभाग**
**लेखा कोष भवन ३रा मजला, कक्ष क्र.३९,**
**जिल्हाधिकारी कार्यालय प्रांगण, पुणे ४११००१**


महाराष्ट्र शासन संचालनालय लेखा व कोषागारे

## परिपत्रक

**दि. 6 डिसेम्बर 2018**

महाराष्ट्र कोषागार नियम 1968 जारी झाले नंतर त्यावर अनेक सुधारणा वेळोवेळी निर्गमित झाल्या आहेत. 1990 पासुन कोषागाराच्या कामकाजाचे व्यापक संगणत्रीकरण झालेले आहे. त्यामुळेही कोषागार नियमामध्ये आमुलाग्र सुधारणा करणे अनिवार्य झाले आहे म्हणून महाराष्ट्र कोषागार नियम 1968, आमुलाग्र बदलण्याचे कामासाठी समंत्रक कक्षाची निर्मिती केली. हे काम श्री.शिलानाथ जाधव निवृत्त संचालक लेखा व कोषागारे यांचेकडे सोपविलेले आहे. तरी विविध विभाग अधिकारी - कर्मचारी व संघटना यांना आवाहन करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांचे सूचनात्मक प्रस्ताव श्री.शिलानाथ जाधव यांचेकडे पाठवावेत.

- सर्व विभाग, अधिकारी व कर्मचारी याना त्यांचा प्रस्ताव योग्य त्या मार्गाने(through proper channel) अथवा थेट संमत्रक कक्षाकडे पाठविण्याची मुभा आहे. तसेच श्री.जाधव यानाही सुचनात्मक प्रस्तावाशी सम्बंधीत पत्रव्यवहार करण्याची मुभा असेल.
- अधिकारी - कर्मचारी संघटना अथवा सेवानिवृत्त संघटना यांनी त्यांचा प्रस्ताव त्यांचे शिखर संघटनेमार्फतच पाठवावेत.
- प्रस्ताव खालील नमुन्यात पाठवावा अन्य स्वरुपात पाठविलेल्या प्रस्तावांची दखल घेतली जाणार नाही.

| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | विदयमान नियम क्र. | नियमाचा उतारा | प्रस्तावित सुधारणा | सुधारणा करण्याची काय गरज | उपलब्ध असल्यास प्राधीकार |
| Sr.No. | Prevailing Rule No. | Extract of Rule | Proposed amendment | Necessity of amendment | Authority available if any |

प्रस्ताव इंग्रजी अथवा मराठीत पाठविता येतील. सदर प्रस्ताव पुढील पत्त्यांवर पाठविण्यात यावेत.

1. लिखीत कागदी प्रस्ताव श्री शिलानाथ जाधव, समंत्रक, पोस्ट बॉक्स क्र.17, प्रधान पोस्ट ऑफिस पुणे - 411001, या पत्त्यावर पाठवावेत
2. प्रस्ताव ई-मेल व्दारे पाठविल्यास consultant@mahakosh.in या पत्त्यावर पाठवावेत
3. तसेच पूर्वनियोजित वेळेनुसार समक्ष भेटण्यासाठी पत्ता -

श्री.शिलानाथ जाधव,
कक्ष क्र.39, लेखा कोष भवन,
3 रा मजला, जिल्हाधिकारी आवार,
पुणे - 411001

समंत्रक